# प्रेसनोट

नाशिक,
दि. ३१/०१/२०२४

**आलोसे मनोहर अनिल राठोड, मंडळ अधिकारी, राजापुर, ता.येवला जि.नाशिक यांनी २५०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | मनोहर अनिल राठोड, मंडळ अधिकारी, राजापुर, ता.येवला जि.नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे शेतकरी असुन त्यांनी राजापुर येथे विकत घेतलेल्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर मौजे राजापुर तलाठी यांनी तक्रारदार यांची मालकी हक्काबाबत घेतलेली नोंद प्रमाणित करणेसाठी आलोसे मनोहर अनिल राठोड, मंडळ अधिकारी, राजापुर, ता.येवला जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे २५०००/- रू लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे मनोहर अनिल राठोड, मंडळ अधिकारी, राजापुर, ता.येवला जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे २५०००/- रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि. ३१.०१.२०२४ रोजी स्विकारल्याने त्यांना त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ गुन्हा नोंदविण्याची पुढील कार्यवाही सुरू आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००

( नरेंद्र भा. पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक